खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## प्रथम वर्ष वाणिज्य

## सत्र १

## विषय

## सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती

## प्रकरण ४

## शासन आणि सहकारी चळवळ

# प्रकरण ४
# शासन आणि सहकारी चळवळ

**प्रस्तावना**

सरकारने घेतलेल्या सक्रीय पुढाकारामुळे भारतात १९०४ मध्ये सहकरी चळवळीस आरंभ झाला. या प्रकरणामध्ये आपण राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांची सहकार क्षेत्रातील म्हणजेच सहकार क्षेत्राच्या विकासात त्यांची भूमिका यांचा अभ्यास करणार आहोत तसेच सहकाराचा भांडवलशाही आणि साम्यवाद यांच्याशी असणारा संबंध देखील अभ्यासणार आहोत.

## महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राच्या विकासात राज्य सरकारची भूमिका

महाराष्ट्रामध्ये सहकार क्षेत्राच्या विकासात कै. वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, विखे पाटील इत्यादी थोर व्यक्तींचा फार मोठा वाटा आहे. त्यांच्या प्रयन्नामुळेच महाराष्ट्रामध्ये सहकार चळवळ सर्व क्षेत्रात यशस्वी ठरल्या.

सहकाराच्या विकासातील राज्यशासनाची भूमिका :

**१) स्वतंत्र कायद्याची निर्मिती :**

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर ९ मे, १९६१ रोजी सहकारी क्षेत्रासाठी स्वतंत्र कायदा मंजूर करण्यात आला. हा कायदा सहकारी संस्थांचा कायदा, १९६० या नावाने ओळखला जातो. राज्यातील सहकारी क्षेत्राचे नियंत्रण व नियमन या कायद्यानुसार केले जाते. राज्याच्या सहकार क्षेत्राच्या विकासात या कायद्याचे महत्त्वाचे योगदान आहे. या कायद्यात एकूण १६७ कलमे आहेत.

**२) सहकार खाते :**

महाराष्ट्रामध्ये शासनाचे स्वतंत्र सहकार खाते कार्यरत असून या खात्यामार्फत सहकारी चळवळीच्या विकासासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबविले जातात. भारतात सहकारी क्षेत्राच्या विकासासाठी ज्या योजना राबविण्यात आल्या आहेत त्यातील अनेक योजना सर्वप्रथम महाराष्ट्र राज्यातच सुरु करण्यात आल्या आहेत. उदा. पीक कर्ज योजना, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी बँकिंग अशा क्षेत्रांनी चांगली प्रगती केली आहे. त्यामुळेच सहकार क्षेत्रात महाराष्ट्र राज्याचा नावलौकिक आहे.

**३) विविध संस्थांची निर्मिती :**

अ) राज्य सहकारी संघ :

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ ही सहकारी शिक्षण व प्रशिक्षणविषयक कार्यांची जबाबदारी पार पाडणारी राज्यपातळीवरील सर्वोच्च सहकारी संस्था आहे. या संस्थेकडून सहकार खाते व सहकारी संस्थांच्या प्रशिक्षणाची व्यवस्था केली जाते. सहकारी संस्थांचे सेवक व सभासद व शासकीय कर्मचारी यांच्या वि शिक्षण व प्रशिक्षणाची योजना तयार करणे, सहकारी तत्त्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे, सहकारविषयावरील नियतकालिके व पुस्तकांचे प्रकाशन, सहकारी संशोधन व

अभ्यासाला चालना देणे इ. कार्ये या संघामार्फत पार पाडली जातात. महाराष्ट्राच्या सहकार निबंधकाचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे. निबंधक हा आय.ए.एस. सेवेतील अधिकारी असतो. १९६८ पासून निबंधकांना आयुक्त हा दर्जा देण्यात आला आहे.

**ब) साखर आयुक्तालय :**

महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात साखर उद्योग हा महत्त्वपूर्ण उद्योग आहे. या उद्योगाची व्याप्ती, भांडवल, रोजगार, उत्पादन इ. बाबतीत या उद्योगाचे स्थान बरेच वरचे आहे.सहकारी साखर कारखान्यांच्या महत्त्वाच्या स्थानामुळे या उद्योगांच्या कारभाराच्या संदर्भात स्वतंत्र साखर आयुक्तालयाचे मुख्य कार्यालय पुणे येथे आहे. साखर आयुक्त हे आय. ए. एस. दर्जाचे अधिकारी या विभागाचे प्रशासकीय प्रमुख असतात.

**क) महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळ :**

सहकारी संस्था व सहकारी प्रकल्प सक्षमपणे चालावेत यासाठी सन २००० मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या महामंडळाने सहकारी संस्था व सहकारी प्रकल्पांना प्राधान्याने वित्तपुरवठा करण्याचे धोरण ठेवले आहे. त्यानुसार सहकारी कृषी व कृषी आधारित उद्योग ऊर्जानिर्मिती, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, विद्युतनिर्मिती प्रकल्प यांना वित्तपुरवठा व तांत्रिक साहाय्य दिले जात आहे.

**ड) महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ :**

महाराष्ट्र राज्य कृषी पणन हे मंडळ राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कार्यावर देखरेख व नियंणि ठेवणे, त्यांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे इ. कार्य करते. कृषी विपणनाच्या संदर्भातील संशोधन व अभ्यासाला प्रोत्साहन देण्याचे कार्य हे महामंडळ करते.

**४) त्रिस्तरीय वित्त साहाय्य योजना :**

राज्यामध्ये पतविस्ताराचे कार्य कार्यक्षमपणे करता यावे म्हणून महाराष्ट्र शासनाने त्रिस्तरीय वित्तसाहाय्य योजना राबविली आहे. महाराष्ट्रामध्ये भूविकास बँका, व्यापारी बँका तसेच नाबार्ड सहकारी संस्थांना वित्त साहाय्य करतात.

**५) विविध योजना :**

शासन सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी अनेक प्रकारच्या योजना राबविते. या योजनांतर्गत महिला सहकारी संस्थांना विशेष साहाय्य दिले जाते. दुर्बल घटकांच्या सहकारी संस्थांनाही महाराष्ट्र सरकार भरीव मदत करते. महाराष्ट्रात सहकाराला अशा प्रकारे जास्तीत जास्त सोयी व सवलती मिळत गेल्याने आर्थिक विकासाची प्रक्रिया जोमाने सुरू झाली. महाराष्ट्राच्या आर्थिक नियोजनामध्ये व प्रगतीमध्ये सहकार चळवळीचे स्थान महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र शासनाच्या साहाय्यानेच महाराष्ट्रात अनेक सूतगिरण्या व सहकारी साखर कारखाने अस्तित्वात आलेले आहेत.

## सहकारी चळवळीच्या विकासातील केंद्र सरकारची भूमिका

सहकार चळवळीच्या विकासातील केंद्र सरकारची भूमिका खालील मुद्द्यांच्या साहाय्याने स्पष्ट करता येईल :

**१) वेगवेगळ्या समित्यांची स्थापना :**

भारतातील सहकारी क्षेत्राची प्रगती आजमावण्यासाठी तसेच सहकार क्षेत्राच्या विकासासाठी योग्य उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने काही समित्यांची/ मंडळांची नेमणूक केली. त्यामध्ये राष्ट्रीय विकास मंडळ, वैकुंठलाल मेहता समिती, सहकारी प्रशिक्षण अभ्यासगट, ग्राहक सहकारी समिती इत्यादींचा समावेश होता. या समित्यांनी पाहणी करून केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात आली. त्यामुळे सहकारी संस्थांचा झपाट्याने विकास झाला.

**२) वित्तीय साहाय्य आणि विकास कार्यक्रम :**

नियोजन काळामध्ये तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात सहकारी संस्थांना विशेष स्थान देण्यात आले. त्यासाठी खरेदी-विक्री संस्था, लघु व्यवसाय, पाणी पुरवठा, शेती प्रक्रिया संस्था, जीवनावश्यक वस्तू पुरवणाऱ्या संस्था तसेच गृहनिर्माण संस्थांचा विचार करण्यात आला. या योजनेमध्ये सहकार क्षेत्राबद्दल विशाल दृष्टिकोन ठेवण्यात आला होता. ग्रामीण भागात सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र वाढावे यासाठी प्रयत्न केला गेला. सहकार क्षेत्राच्या विकासासाठी ८० कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती.

**३) राष्ट्रीय सहकारी विकास निगम या संस्थेची स्थापना :**

राष्ट्रीय सहकारी विकास निगम ही संस्था लोकसभेने कायदा मंजूर करून स्थापन केलेली संस्था आहे. सहकारक्षेत्राचा विकास करून देशातील शेतमालाचे उत्पादन वाढविणे, शेतमालाचे विपणन करणे, शेतमालाचा साठा करणे शेतकऱ्यांना खते पुरविणे व ग्रामीण भागात उपभोग्य वस्तूंचा पुरवठा करणे ही उद्दिष्टे आहेत. तसेच मच्छिमारी, कोंबड्यांचे उत्पादन, दुधाचे उत्पादन वा कापडाचे उत्पादन या क्षेत्रात सहकारी संस्थांचा विकास घडवून आणण्यासाठी ही संस्था प्रयत्न करीत असते. ही संस्था सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांना कर्जे देते.

**४) राष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना :**

केंद्र शासनाने राष्ट्रीय पातळीवर काम करण्यासाठी राष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना करून सहकार विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. ही भारतातील सहकारी संस्थांची शिखर संघटना आहे. ही भारतातील संस्थांच्या कार्याबद्दल लोकांच्या मनात आस्था व उत्साह निर्माण करणे, माहितीचे वितरण करणे, चर्चासत्रे, परिषदा व सभा आयोजित करणे ही या संस्थेची कामे आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकारी संस्थांशी संपर्क राखण्याचे कार्य ही संस्था करते.

**५) सहकारी साखर कारखान्यांची स्थापना :**

साखरेच्या क्षेत्रात सहकार क्षेत्राने विशेष कामगिरी बजावली आहे. सहकाराने देशात अनेक सहकारी साखर कारखान्यांना परवाना देऊन सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेस प्रोत्साहन दिले व सहकारी चळवळीत महत्त्वाचे योगदान दिले. कारण या सहकारी संस्थांमुळे इतर अनेक छोट्या मोठ्या सहकारी संस्था स्थापण्यात आल्या. आजारी सहकारी साखर कारखान्याच्या उत्थापनासाठी सरकारने मोठ्या प्रमाणावर वित्त साहाय्य पुरविले.

**६) सहकारी सूत गिरण्या :**

सरकारने प्रथमपासूनच सहकारी सूत गिरण्यांना उत्तेजन दिले आहे. सहकारी सूत गिरण्यांमुळे कापूस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना कापसाला वाजवी भाव मिळतो. शिवाय सहकारी हातमाग चालविणाऱ्या कारागिरांना चांगल्या दर्जाचे सूतही मिळते. राष्ट्रीय सहकारी विकास निगमने सहकारी सूत गिरण्यांना खूपच आर्थिक साहाय्य दिले आहे. सहकारी सूत गिरण्यांना भारतीय औद्योगिक वित्त निगम, भारतीय औद्योगिक विकास बँक, भारतीय औद्योगिक पत व गुंतवणूक नियम यांनीही मोठ्या प्रमाणावर आर्थिक साहाय्य दिले आहे.

**७) सहकार क्षेत्रातील साठवणीच्या सोयी :**

शेतमालाचे उत्पादन झाल्यानंतर लगेच जर शेतमाल विकला तर त्याला कमी भाव येतो. त्यामुळे असा माल साठवून ठेवणे फायद्याचे असते. मात्र शेतकऱ्यांकडे अशा सुविधा नसल्याने त्यांना त्यांचा माल लगेच विकावा लागत असे. शेतकऱ्यांची ही अडचण दूर करण्याच्या दृष्टीने सरकारने सहकार क्षेत्रात साठवणीच्या सोयींची तरतूद केलेली आहे. राष्ट्रीय सहकारी विकास निगम या संस्थेने ग्रामीण क्षेत्रात सहकारी क्षेत्रातील गोदामे काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत दिली आहे.

**८) सहकारी क्षेत्राचे प्रशिक्षण :**

सहकारी क्षेत्राचे प्रशिक्षण देण्यासाठी देशात अनेक प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली जातात. या बाबतीत वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था विशेष कार्य करीत आहे. भारत सरकार प्रशिक्षणाचा सर्व खर्च करते. देशात मध्यम पातळीवर प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. तसेच कनिष्ठ पातळीवरील शिक्षण देणाऱ्या संस्थाही काढल्या आहेत वरिष्ठ पातळीवरील शिक्षण मात्र वैकुंठभाई मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेमध्येच देण्यात येते.

**९) आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना मदत :**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या लोकांना मदत व्हावी म्हणून अनेक सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत. या संस्थांमध्ये मासेमारी, कोंबड्या पाळणे, दूध उत्पादन आणि मधमाशी पालन ही कार्ये हाती घेतली जातात. तसेच बांधकामावर काम करणारे मजूर, जंगलात काम करणारे मजूर, रिक्षा चालविणारे, धोबी, चांभार, फिरते विक्रेते वगैरेंच्या सहकारी संस्था काढण्यात भारत सरकारने विशेष प्रयत्न केले आहेत. या सहकारी संस्थांना भारत सरकार विशेष मदत देते.

## सहकार आणि भांडवलशाही (Co-operation and Capitalism)

ब्रिटन आणि अमेरिका यांसारख्या राष्ट्रांत भांडवलशाही आहे असे म्हणता येईल. या दोन्ही देशात खाजगी भांडवलदार उद्योग व व्यवसाय करीत असतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत 'वैयक्तिक लाभ' ही प्रमुख प्रेरणा असते. "एच कल्व्हर्ट' या विचारवंतांच्या मते, सहकारी चळवळीमुळे भांडवलशाहीतील दोष कमी होण्यास मदत होते.

**सहकारी अर्थव्यवस्था व भांडवलशाही अर्थव्यवस्था यात साम्य –**

१) भांडवलशाही अर्थव्यवस्थेप्रमाणेच सहकारी अर्थव्यवस्थेत आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कार केला जातो.

२) ह्या दोन्ही अर्थव्यवस्थेत भांडवलाचा उपयोग करण्यात येतो व भांडवलदार व्याज दिले जाते.

३) दोन्ही अर्थव्यवस्थेत व्यवसाय चालविण्याची जबाबदारी 'व्यवस्थापकीय संचालकावर' असते.

४) भांडवलशाही अर्थव्यवस्थेप्रमाणेच सहकारी अर्थव्यवस्थेचे यशपयश व्यावसायिक कार्यक्षमतेवर अवलंबून असते.

५) भांडवलशाही अर्थव्यवस्थेप्रमाणेच सहकारी अर्थव्यवस्थेत सरकारच्या हस्तक्षेपास विरोध असतो. वास्तविक सहकारी चळवळ म्हणजे भांडवलशाही विरुध्दचे बंड आहे.

**भांडवलशाही अर्थव्यवस्था व सहकारी अर्थव्यवस्था पध्दतींतील फरक**

| मुद्दे | भांडवल शाही अर्थव्यवस्था | सहकारी अर्थव्यवस्था |
|---|---|---|
| महत्व | -भांडवलशाही अर्थव्यवस्थेत व्यक्तीच्या भांडवलाला महत्व असते | -सहकारी अर्थव्यवस्थेत व्यक्तीला महत्व असते. |
| प्रेरणा | -भांडवलशाही अर्थव्यवस्थेत 'नफा' ही आर्थिक व्यवहारांची प्रेरणा असते. | -सहकारी अर्थव्यवस्थेत 'सेवा' ही प्रेरणा असते. |
| लोकांची स्थिती | -भांडवलशाही अर्थव्यवस्थेत लोकांची पिळवणूक होते. | -सहकारी अर्थव्यवस्थेत व्यक्तींची पिळवणुकीतून मुक्तता केली जाते. |
| प्राधान्य | -भांडवलशाही अर्थव्यवस्थेत स्पर्धा, परस्पर विरोध इत्यादी गोष्टी गृहित असतात. | -सहकारी अर्थव्यवस्थेत स्वसेवा, एकमेकांना सहकार्य इत्यादींना प्राधान्य दिले जाते. |
| संघटना | -भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदारांची संघटना असते. | -सहकारी अर्थव्यवस्थेत साधारण व्यक्तींची संघटना असते. |
| संपत्तीचे केंद्रीकरण / विकेंद्रीकरण | -भांडवलशाही अर्थव्यवस्थेत संपत्तीचे केंद्रीकरण होते | -सहकारी अर्थव्यवस्थेत संपत्तीचे विकेंद्रीकरण होत असते. |
| स्थैर्यता | -भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अनिश्चितता असल्याने तेजी मंदीचे दुष्परिणाम सोसावे लागतात. | -सहकारी अर्थव्यवस्थेत निश्चितता असल्याने आर्थिक स्थैर्य येते. |

वरील दृष्टीने विचार केल्यास असे म्हणता येईल कि, 'बर्नार्ड शॉ' यांनी म्हटल्याप्रमाणे, भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नफा हे अंतिम उद्दिष्ट असते आणि पैसा व सोने हे दैवत मानले जाते. परंतु सहकारी अर्थव्यवस्थेत 'सेवा' हेच अंतिम उद्दिष्ट असते.

## सहकार आणि साम्यवाद (Co-operation and Communism)

साम्यवादी अर्थव्यवस्था हे भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे दुसरे टोक समजले जाते. साम्यवादी अर्थव्यवस्थेत राष्ट्रातील सर्व उत्पादन-साधने सरकारच्या मालकीची असतात. साम्यवादी अर्थव्यवस्थेचा इतिहास लक्षात घेता असे स्पष्ट होते की, भांडवलशाही विरोधी प्रतिक्रियेतून ही अर्थव्यवस्था अस्तित्वात आली आहे. श्रमिक, गरिब व दुर्बल व्यक्तींचे शोषण व अडवणूक थांबविण्यासाठी साम्यवाद चळवळ साकारली आहे.

### सहकारी अर्थव्यवस्था व साम्यवादी अर्थव्यवस्थामधील साम्य

१) साम्यवादी अर्थव्यवस्थेप्रमाणे सहकारी अर्थव्यवस्थेत संपत्ती व उत्पन्नाचे समान विभाजन होते.
२) दोन्ही अर्थव्यवस्था भांडवलशाही विरुध्दच्या बंडातून अस्तित्वात आल्या आहेत.
३) दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये नफ्यापेक्षा 'सेवाभाव' यास प्राधान्य दिले जाते.
४) देशातील साधनसामुग्रीचा काटकसरीने उपयोग दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये केलेला दिसून येतो.
५) साम्यवादी व सहकारी अर्थव्यवस्थेत लोकशाही मान्य करण्यात येते.
६) साम्यवादी तसेच सहकारी अर्थव्यवस्थेत समता, स्वातंत्र्य व बंधुत्व या त्रिसुत्रीचा स्विकार केलेला दिसून येतो.
७) साम्यवादी व सहकारी अर्थव्यवस्थेत स्पर्धा ही संपुष्टात आणली जाते.

'लेनिन' च्या मते, सहकारी चळवळीचा प्रसार म्हणजेच साम्यवाद होय. साम्यवादी व सहकारी अर्थव्यवस्था यात फार साम्य आहे हे मान्य करता येईल परंतु त्यावरून या दोन पध्दती एकच आहेत असा निष्कर्ष काढता येणार नाही. 'इलियट' यांच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोष दूर करण्याचा राजकीय उपाय म्हणजे साम्यवाद तर अराजकीय उपाय म्हणजे सहकारी अर्थव्यवस्था होय.

## साम्यवादी अर्थव्यवस्था व सहकारी अर्थव्यवस्था यामधील फरक

| मुद्दे | साम्यवादी अर्थव्यवस्था | सहकारी अर्थव्यवस्था |
|---|---|---|
| मालमत्तेचा अधिकार | -साम्यवादी अर्थव्यवस्थेत खाजगी मालमत्तेचा अधिकार संपुष्टात येतो. | -सहकारी अर्थव्यवस्थेत अबाधित राहतो. |
| उद्दिष्ट | -साम्यवादी अर्थव्यवस्थेत सार्वजनिक कल्याण हे उद्दिष्ट असते | -सहकारी अर्थव्यवस्थेत फक्त सभासदांचे कल्याण हे उद्दिष्ट असते. |
| शस्त्रे | -साम्यवादी अर्थव्यवस्थेत सक्ती व दडपण ही शस्त्रे वापरली जातात. | -सहकारी अर्थव्यवस्थेत 'ऐच्छिकता' व स्वातंत्र्य इत्यादींना महत्व असते. |
| निर्णय | -साम्यवादी अर्थव्यवस्थेत 'मध्यवर्ती नियोजन मंडळ' निर्णय घेत असते | -सहकारी अर्थव्यवस्थेत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य सभासदांना असते. |
| नफा | -साम्यवादी अर्थव्यवस्थेत उद्योगधंद्यापासून मिळणारा नफा सरकारी तिजोरीत जमा होतो | -सहकारी अर्थव्यवस्थेत तो सभासदांना लाभांशाच्या स्वरूपात वाटला जातो. |
| नियंत्रणाची सुत्रे | -साम्यवादी अर्थव्यवस्थेत नियंत्रणाची सुत्रे सरकारकडे असतात | -सहकारी अर्थव्यवस्थेत ती सभासदांच्या ताब्यात असतात. |
| राजकीय प्रभाव | -साम्यवादी अर्थव्यवस्थेत राजकीय प्रभाव व दडपण असते | -सहकारी अर्थव्यवस्थेत त्याचा अभाव पाहायला मिळतो. |

-------------------------------The End---------------------------------------

**संदर्भ ग्रंथ**

१) डॉ.धीरज झाल्टे व इतर, सहकार: सिद्धांत आणि कार्यपद्धती(२०२०), प्रशांत पब्लिकेशन,जळगाव.
२) प्रा.नंदा लहाडे, सहकार (२०१३), आयडॉल पब्लिकेशन, पुणे.
३) महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यास क्रम संशोधन मंडळ ,पुणे : सहकार
४) तापकीर मुकुंद व साबळे आर.जे. (२००५), सहकार ,निराली प्रकाशन ,पुणे
५) डॉ. आर के दातीर (२००९) 'भारतातील बँक व्यवसाय आणि सहकार , निराली प्रकाशन,पुणे
६) जोशी सी जे (१९८६ ), सहकार , फडके प्रकाशन, कोल्हापूर